# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

वेबसाईट : www.amc.gov.in

ई-मेल : amc_anr@rediffmail.com

ई-मेल : it.nagar@amc.gov.in

**विषय : - सेवानिवृत्त अधिकारी यांची मासिक परिश्रामिकावर करारबध्द पध्दतीने नेमणुकी बाबत**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक २७१५ / प्र. क्र. १०० / १३, मंत्रालय, मुंबई, दि. १७ डिसेंबर, २०१६ चे निर्णयाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, व बांधकाम विभागासाठी खालील नमूद केलेल्या पदांकरिता शासकीय / निमशासकीय सेवेतून खालील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या पदांवरुन सेवानिवृत्त झालेले सेवानिवृत्त अनुभवी अधिकारी यांची करारबध्द पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधीकरिता दरमहा मासिक परिश्रामिकावर अटी व शर्ती प्रमाणे नियुक्ती करीता संबधित इच्छुक पात्रताधारक यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

खालील दर्शविलेल्या समकक्ष पदांवरुन शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त झालेले अनुभवी अधिकारी महानगरपालिकेमध्ये सेवेकरीता इच्छुक असल्यास संबधित पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक २७१५ / प्र. क्र. १०० / १३, मंत्रालय, मुंबई, दि. १७ डिसेंबर, २०१६ अन्वये निर्णयाधील नमुद केलेले तपशिलाचे अवलोकन करुन संबधितांनी विहित नमुन्यातील अर्ज टंकलिखित / संगणकीकृत स्वरुपात मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे नावे करुन अर्जासह सर्व कागदपत्रांच्या छायंकिन्त प्रतीसह दिनांक १७/ १० / २०२२ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यत अहमदनगर महानगरपालिका, औरंगाबाद रोड, अहमदनगर या कार्यालयामध्ये पोहचतील अशा रितीने विहीत मुदतीत सादर करावीत, विहीत वेळेनंतर / दिनांकानंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही. अपुर्ण स्वरुपातील, स्वाक्षरी नसलेले, अर्हता धारणे करीत नसलेले अर्ज निवड प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद संबधितांनी घ्यावी. याबाबत निवड प्रक्रियेमधील बदल करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांनी राखुन ठेवण्यात आलेला आहे.

| अं. क्र | विभागाचे नांव | पदनाम | पद संख्या | दरमहा मासिक परिश्रामिक | पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा विभाग | जल अभियंता | १ | दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयामधील नमूद परिशिष्ट (अ) नुसार देय राहील. | समकक्ष पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी |
| | | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | १ | | |
| २ | बांधकाम विभाग | शहर अभियंता | १ | | |
| | | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | १ | | |

**मासिक परिश्रामिकावर करारबध्द पध्दतीने नेमणुकी बाबत खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहील.**

१] करार पध्दतीवर नेमणूकी करिता संबधित सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज करतेवेळी त्यांचे वय दिनांक ३०/०९/२०२२ रोजी ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

२] संबधित अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुध्द तत्कालीन सेवेमध्ये त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित नसावी, याबाबत अर्जदाराने ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या संबधीत कार्यालयाकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात येवून सादर करावे.

३] करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या / कोणत्याही संवर्गाची सेवा समावेशा बाबत किंवा सामावून घेण्याबाबत नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळणेचा अधिकार नसलेबाबत अर्जदाराने रु. १००/- रुपयाच्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र लेखा देण्यात यावा.

४] नियुक्त अर्जदाराला त्याने विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२७१५ / प्र. क्र. १०० / १३, दिनांक १७/१२/२०१६ मधील अटी व शर्ती प्रमाणे ज्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांना अनुज्ञेय राहील.

५] नियुक्ती प्राधिकारी ( आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीने सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहील.

६] करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकराक नसल्यास कोणतेही सबळ पुरावा न देता त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

७] क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवा काळामध्ये नैसर्गिक अपघात व काही आजार उद्‌भवल्यास अहमदनगर महानगरपालिका / शासन बांधिल राहणार नाही.

८] करार पध्दतीनें नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली सर्व कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

९] अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त संबंधित अधिकारी यांनी त्यांचे सेवा निवृत्तीचे मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत / निवृत्तीचे कागदपत्र सादर करावेत . / माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यत सेवानिवृत्त होणा-या संबंधित पदावरील अधिकारी हे अर्ज करु शकतात. तथापि त्यांचा अर्ज सेवानिवृत्ती नंतर विचारात घेण्यात येईल.

१०] करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्त ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत रुजू होणे आवश्यक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

११] संबंधितांची कराराबध्द पध्दतीने नियुक्ती सहा महिन्याच्या पुढे वाढवण्याची आवश्यकता भासल्यास मनपा नियुक्ती प्राधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

१२] करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होऊन अशा व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी. तसेच त्यांना प्राप्त होणा-या कामाप्रती माहिती आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक आहे.

१३] मुलाखती करिता पात्र संबंधित उमेदवारांना पत्र समक्ष / पोष्टाने / ई - मेलद्वारे पाठविण्यात येईल, यास्तव संबंधित अर्जदाराने आपल्या माहितीत त्याचा ई-मेल, संपुर्ण पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक राहील. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, येथे सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी कार्यालयाच्या नोटीस फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

उपरोक्त **१** ते **१३** अटी व शर्ती संबंधितांस अर्जदारास मान्य आहेत, याबाबत संबंधित अर्जदाराने रु. १००/- रुपयेच्या मुद्रांकावर बंधपत्र देणे आवश्यक राहील, सदर नियुक्ती करार पध्दतीने अहमदनगर महानगरपालिकेच्या दर्शविलेल्या विभागामध्ये करण्यात येईल, व संबंधित निवड उमेदवारास मनपाचे आयुक्त, संबंधित वरिष्ठ अधिकारी यांचे सुचनेनुसार व नियंत्रणामध्ये कामकाज करणे बंधनकारक राहील यांची नोंद घ्यावी.

**आयुक्त**

**अहमदनगर महानगरपालिका**

E:\OA9.doc